22 MAY 2018 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या आजपासून प्रवेश परीक्षा

## १२ हजार १५७ परीक्षार्थी; ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने होणार परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन व ऑफलाईन प्रवेश परीक्षा मंगळवारपासून (दि.२२) सुरू होत आहेत. परीक्षांचे आयोजन शिवाजी विद्यापीठ व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये करण्यात आले आहे. १२ हजार १५७ विद्यार्थी परीक्षा देणार असून, यामध्ये ११ हजार ४६७ विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देणार आहेत. तर ६९० विद्यार्थी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देणार आहेत. यासाठी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये परीक्षेची व्यवस्था करण्यात आली आहे. २९ मेपर्यंत परीक्षा असणार आहेत.

**अशा होतील परीक्षा**

एकूण २४ परीक्षा केंद्रांवर ३८ अभ्यासक्रमांकरिता परीक्षा होणार आहे. यामध्ये २७ विषयांकरिता ऑनलाईन पध्दतीने परीक्षा होणार असून ११ विषयांसाठी ऑफलाईन पद्धतीने एम. ए. फॅकल्टी चेंज सैध्दांतिक पध्दतीने विषयाची परीक्षा होणार आहे. २७ विषयांकरिता कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १२ परीक्षा केंद्रे, सांगली जिल्ह्यातील ५, तर सातारा जिल्ह्यातील ६ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. एकूण १२,१५७ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून, यापैकी ११,४६७ विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा तर ६९० विद्यार्थी ऑफलाईन (एम.ए. फॅकल्टी चेंज) परीक्षेस बसणार आहेत.

**विद्यार्थ्यांना आवाहन**

प्रवेशपत्र विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले असून, सर्व विद्यार्थ्यांना ते डाऊनलोड करण्यासांठी एसएमएस पाठविण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरताना काही तांत्रिक अडचणी आल्या असतील त्यामुळे नेमलिस्टमध्ये नाव आले नसेल किंवा प्रवेशपत्र उपलब्ध झाले नसेल परंतु, त्यांनी प्रवेशपरीक्षा शुल्क ऑनलाईन भरले असेल तर त्याची पावती दाखवून नोंदणीकृत परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहावयाचे आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी परीक्षेसाठीची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. त्याबाबतच्या सूचना सर्व परीक्षा केंद्रावरील समन्वयकांना देण्यात आल्या आहेत.

> **परीक्षा केंद्रे**
> **ऑफलाईन** - मानव्यशास्त्र इमारत, शिवाजी विद्यापीठ
> **ऑनलाईन**- कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील एकूण २३ केंद्रे

**विद्यार्थ्यांना सूचना**

विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर काळ्या शाईचे बॉलपेन, प्रवेशपत्र, अधिकृत ओळखपत्रासह परीक्षेपूर्वी अर्धा तास अगोदर उपस्थित राहावयाचे आहे. परीक्षा कक्षामध्ये मोबाईल, तसेच इतर इलेक्ट्रिक साहित्य बाळगण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

जनसंपर्क कक्ष

22 MAY 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा आजपासून



म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षा आजपासून (ता. २२) पासून सुरू होत आहेत. २९ मे पर्यंत पहिल्या टप्प्यातील परीक्षा होणार आहेत. विद्यापीठ व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये येत्या शैक्षणिक वर्षासाठी घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये परीक्षेची व्यवस्था करण्यात आली आहे.

एकूण २४ परीक्षा केंद्रावर ३८ विषयांसाठी परीक्षा होणार आहे. यामध्ये २७ विषयांकरिता ऑनलाईन पद्धतीने परीक्षा होणार असून, ११ विषयांसाठी ऑफलाइन पद्धतीने परीक्षा होणार आहे. २७ विषयांसाठी कोल्हापूर जिल्हयातील एकूण १२ परीक्षा केंद्रे , सांगली जिल्ह्यातील ५, तर सातारा जिल्ह्यातील ६ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. एकूण १२ हजार १५७ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून यापैकी ११ हजार, ४६७ विद्यार्थी ऑनलाइन परीक्षा देणार आहेत तर ६९० विद्यार्थी ऑफलाइन (एम. ए. फॅकल्टी चेंज) परीक्षेस बसणार आहेत.

विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमातीमध्ये बुधवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत (एम. ए. फॅकल्टी चेंज) विविध विषयांची परीक्षा होणार असून परीक्षा विभागामार्फत सर्व पूर्व तयारी करण्यात आली आहे. ऑनलाइन परीक्षेकरिता जिल्हानिहाय तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली असून विद्यापीठामध्ये मुख्य तांत्रिक समितीद्वारा पूर्ण समन्वयन केले जाणार आहे. परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले असून सर्व विद्यार्थ्यांना ते डाऊनलोड करण्यासाठी एसएमएस पाठविण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरताना काही तांत्रिक अडचणी आल्या असतील त्यामुळे नेमलिस्टमध्ये नाव आले नसेल किंवा प्रवेशपत्र उपलब्ध झाले नसेल परंतु त्यांनी प्रवेशपरीक्षा शुल्क ऑनलाइन भरले असेल तर त्याची पावती दाखवून नोंदणीकृत परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहावयाचे आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी परीक्षेसाठीची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2018
तरुण भारत

# विद्यापीठ अंतर्गत आज ३८ विषयांच्या प्रवेश पूर्व परीक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विद्यापीठ व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आज (ता. २२) सकाळी ९.३० वाजता प्रवेश पूर्व परीक्षेला सुरूवात होणार आहे. दुपारी ३.३० पर्यंत विविध विषयाच्या प्रवेश परीक्षा होतील. २४ परीक्षा केंद्रावर ३८ विषयांसाठी या प्रवेश परीक्षा मंगळवार २९ मे पर्यंत होणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रवेश पूर्व परीक्षांसाठी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये बैठक व्यवस्था केली आहे. यामध्ये एकूण २४ परीक्षा केंद्रावर ३८ विषयांची परीक्षा होणार आहे. यामध्ये २७ विषयांकरिता ऑनलाईन पध्दतीने परीक्षा होईल तर ११ विषयांकरिता ऑफलाईन पध्दतीने एम. ए. फॅकल्टी चेंजची परीक्षा होणार आहे. २७ विषयांकरिता कोल्हापुरात एकूण १२ परीक्षाकेंद्रे , सांगलीत ५, तर साताऱ्यात ६ परीक्षा केंद्रांचा समावेश आहे. एकूण १२ हजार १५७ विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. यापैकी ११ हजार ४६७ विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा तर ६९० विद्यार्थी ऑफलाईन ( एम.ए. फॅकल्टी चेंज) परीक्षा देणार आहेत. विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमातीमध्ये बुधवार २३ रोजी (एम.ए. फॅकल्टी चेंज) विविध विषयांची परीक्षा होणार आहे.

ऑनलाईन परीक्षेकरिता जिल्हानिहाय तांत्रिक समितीचे गठण केले असून विद्यापीठमध्ये मुख्य तांत्रिक समितीद्वारा पूर्ण समन्वयन केले जाणार आहे. परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध केले असून सर्व विद्यार्थ्यांना ते डाऊनलोड करण्यासाठी एसएमएस पाठविले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरताना काही तांत्रिक अडचणी आल्या असतील अशा विद्यार्थ्यांनी नेमलिस्टमध्ये नाव आले नसेल परंतु त्यांनी प्रवेशपरीक्षा शुल्क ऑनलाईन भरले असेल तर त्याची पावती दाखवून नोंदणीकृत परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहावे.

22 MAY 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा आजपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अशा ३८ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचा प्रारंभ आज, मंगळवारपासून होणार आहे. दि. २९ मेपर्यंत होणाऱ्या या परीक्षांसाठी १२ हजार १५७ परीक्षार्थींनी नोंदणी केली आहे. यावर्षी पहिल्यांदाच २७ विषयांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील एकूण २४ केंद्रांवर परीक्षा होणार आहे. त्यात २७ विषयांसाठी ऑनलाईन पद्धतीने, तर अकरा विषयांसाठी ऑफलाईन स्वरूपात एम. ए. फॅकल्टी चेंज विषयाची परीक्षा होणार आहे.

## आकडेवारी दृष्टिक्षेपात

- परीक्षांसाठी दाखल झालेले अर्ज : १२,१५७
- ऑनलाईन पद्धतीतील परीक्षार्थी : ११,४६७
- ऑफलाईन पद्धतीमधील परीक्षार्थी : ६९०

## शुल्काची पावती जवळ ठेवा

ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरताना तांत्रिक अडचणी आल्या असतील, त्यामुळे नेमलिस्टमध्ये नाव आले नसेल किंवा प्रवेशपत्र उपलब्ध झाले नसेल, परंतु त्यांनी प्रवेश परीक्षा शुल्क ऑनलाईन भरले असेल, तर त्याची पावती दाखवून नोंदणीकृत परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहावे. या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेची पर्यायी व्यवस्था केली आहे.

22 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रतिनिधी

# रेशीमशास्त्रातील संधी

तुतीची लागवड ते रेशीम उद्योगशास्त्रातील पदवी हा पारंपरिकतेपासून आधुनिक शिक्षणाचा प्रवास आता शिवाजी विद्यापीठाच्या पुढाकाराने अधिक सोपा झाला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने रेशीम उद्योगात स्वारस्य असलेल्या शेतकरी तसेच शेतीची आवड असलेल्या विद्यार्थ्यांसाठी रेशीमशास्त्रातील पदविका व पदव्युत्तर पदविका हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. देशातील अशा प्रकारचा पहिलाच अभ्यासक्रम विद्यापीठाने सुरू केला असून प्रवेश घेण्यासाठी चांगला प्रतिसाद मिळत आहे.

केंद्रीय हस्तकला मंत्रालयातर्फे रेशीमउद्योगासाठी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच तुतीची लागवड करून त्यामाध्यमातून रेशीम उत्पादनांसाठी काही योजनाही कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकरी तसेच शेतीमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी रेशीम उद्योगाकडे वळावे यासाठी शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेल्या रेशीमशास्त्र अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

रेशीमशास्त्र पदविका हा अभ्यासक्रम मराठी माध्यमातून तर रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका हा अभ्यासक्रम इंग्रजी माध्यमातून शिकवण्यात येणार आहे. यासाठी किमान आठवी उत्तीर्ण अशी शैक्षणिक पात्रता असून ४० प्रवेश क्षमता आहे. दर शनिवारी व रविवारी तीन तास अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू राहणार आहेत. या अभ्यासक्रमात तुतीची लागवड कशी करावी, त्याची जोपासना करण्यापासून रेशीमनिर्मिती व तयार झालेल्या रेशीमची बाजारपेठेतील विक्रीकौशल्य याचेही शास्त्रशुद्ध प्रशिक्षण या अभ्यासक्रमाद्वारे देण्यात येणार आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील तुतीचे पीक घेणाऱ्या शेतकरी तसेच आधुनिक शेतीकडे कल असलेल्या नव्या पिढीतील युवकांना हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे. रेशीमवस्त्र उद्योगाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगला भाव येण्यासाठी या उद्योगाकडे वळावे या हेतूने रेशीमशास्त्र अभ्यासक्रमाला पसंती मिळत आहे. अगदी कमी शेती असलेल्यांनाही यामध्ये चांगले करिअर करता येते. या माध्यमातून चांगले उत्पन्नही मिळवता येते.



## अशी आहे रचना

रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम व रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या इंग्रजी व मराठी माध्यमात वनस्पती लागवड ते रेशीम धागा निर्मितीपर्यंतचे शिक्षण मिळणार आहे. वनस्पती लागवड व व्यवस्थापन शिकवण्यात येणार आहे. तसेच रेशीम कीटक संगोपन, समस्या व निराकरण याची माहिती मिळणार आहे. अंडीपूंज निर्मिती, धागा निर्मिती, अर्थशास्त्र याचेही धडे मिळणार आहेत.

## हे होणार फायदे

रेशीम शेती करत असलेल्या शेतकऱ्यांना रेशीमशेतीची शास्त्रीय माहिती मिळणार आहे. रेशीमकोश उत्पादन व गुणवत्तापूर्ण रेशीम उद्योगास चालना मिळेल. देशासह परदेशात कोशविक्रीला व्यासपीठ मिळेल. प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र तसेच कॉमर्स व कला शाखेतील विद्यार्थ्यांना स्वतंत्र व्यवसाय सुरू करता येईल. केंद्र व राज्य सरकारच्या रेशीम विभागात नोकरीच्या संधी मिळण्यासाठी विशेष प्राधान्य मिळेल.



**शेतीत नवे प्रयोग करणाऱ्या शेतकरी तसेच शेतकरी कुटुंबातील मुलांसाठी हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. रेशीम उद्योग अधिक व्यावसायिक होण्यासाठी अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या रेशीमवस्त्र उद्योगाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळणार आहे.**

**– डॉ. पी. डी. यादव,**
विभागप्रमुख, प्राणीशास्त्र विभाग

22 MAY 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Knowledge of sericulture to help 23 farmers increase crop productivity

Piyush.Bhusari
@timesgroup.com



Rahul Gayakwad

According to course coordinator A D Jadhav, the minimum eligibility was that the candidate should have passed class VII

**Kolhapur:** For 23 farmers from Kolhapur district and other parts of the state, the last week has been hectic, as they were busy preparing for the exam of sericulture diploma course. On Monday, they had their last assignment — a presentation and a viva of what they learned during the course.

According to course coordinator A D Jadhav, the minimum eligibility for the said course, which started in October last year, was that the candidate should have passed class VII.

However, most of the farmers who participated in the course had passed the high school exam. The most important pre-requisite for the course, however, was to involve participation of the farmers who would take up sericulture in their farms.

The farmers from the Marathwada, Western Maharashtra and from Kolhapur region actively participated in this course, for which classes were held on weekends. "We had made arrangements for the outstation farmers to stay at varsity hostels on nominal charges of Rs 25 per day," he added.

When asked about their experience with the farmers the teaching faculty had during this unique course, Jadhav said, "The farmers were highly confident. The only issue was that they knew everything about sericulture but the scientific approach behind that was lacking or not known."

Now these farmers know why the production was low and how it could be increased and how the quality can be improved with few subtle changes, he said.

Zunzar Patil, a farmer from the Yalgud village in Kolhapur district, some 25 km from the city, said, "It was an enlightening course for all the participants and has helped device new strategies for the increased production of silk cocoons."

"Another important thing about the course is that the classes are held on weekends, which makes it convenient for all," he added

22 MAY 2018
Times of India

# Biodiversity centre proposed at SUK campus

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur might soon host a biodiversity centre, as a proposal to start the same is under consideration, A D Jadhav, assistant professor at the department of zoology.

Jadhav, who is also a member of the Maharashtra state biodiversity board, said on Monday that a discussion related to the issue has been done at the preliminary level with the board members and they have asked the varsity to submit a proposal.

Jadhav said the board members have sent a letter to vice-chancellor Devanand Shinde in March for creation of the centre.

The letter said that, biodiversity conservation is an important segment of life sciences. Hence, it is requested that the university may consider inclusion of different aspects of biological diversity act and biodiversity conservation as credit courses in its curriculum of post-graduate students in relevant subjects, specifically botany, zoology and environment science.

**BIOLOGICAL DIVERSITY DAY**

Jadhav said, "We have a large area of over 850 acres. The rare and endangered species that we have here are something that cannot be found anywhere else. Hence, having such a centre might help in increasing awareness about the same among students and general people.

Another teaching faculty said that there are 100 rare and endangered species of plants which are being cultivated in the SUK department's botanical garden. The department has also taken steps for Western Ghat plant species conservation that needs special attention. It could be achieved with the help of funds from this centre.

## Clarification

The Times of India edition dated May 20, 2018 inadvertently repeated a report titled, 'Nature, devotion and spirituality converge at Kurneshwar temple', on Page 2. The oversight is regretted.